SHIVAJI COLLEGE
HINGOLI

# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक
डॉ. नविन केशव सोळंके

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

SHIVAJI COLLEGE • HINGOLI

संपादक

डॉ. नविन केशव सोळंके

नागनाथ महाविद्यालय,

औंढा (नागनाथ), जि. हिंगोली

T.C

Lecturer

Shivaji College, Hingoli

Tq.& Dist.Hingoli (MS.)

ग्लोबल पब्लिकेशन

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-945997-8-4

• **उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती**
**डॉ. नवीन केशव सोळंके**

© सुरक्षित

• **प्रकाशन क्रमांक 3151**

• **प्रकाशक**
ग्लोबल पब्लिकेशन
एल.आय.सी. कॉलनी, लातूर,
ता. जि. लातूर - 413531.

• **अक्षर जुळवणी**
श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

• **मुखपृष्ठ**
श्री. विकास ढमाले

• **मुद्रक**
इंडोव्हिजन ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर, जि. लातूर

• **प्रथमावृत्ती : 26 जानेवारी 2021**

• **मुल्य 350/-**

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अभ्यास **डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे** | १ |
| २ | चल : संशोधनातील एक मापदंड **डॉ. अर्चना के देशमुख** | १२ |
| ३ | गृहितक सिध्दांतावर आधारलेले संशोधन **डॉ. एन. आर. हरगुळे** | १७ |
| ४ | शैक्षणिक संशोधन काळाची गरज **डॉ. एस. एन. मुंढे** | २४ |
| ५ | मानव्य विद्याशाखेतील संशोधन पध्दतीचे स्वरुप आणि दृष्टीकोन **डॉ. मनिषा बाबूराव गवळी** | ३२ |
| ६ | मानव्यविद्या शाखेतील संशोधन पद्धतीतील माहिती संकलनातील समस्या **डॉ. नविन केशव सोळंके** | ४१ |
| ७ | सामाजिक संशोधन आणि वैज्ञानिक अधिष्ठान पध्दती **डॉ. आर.डी. मुक्टे** | ४८ |
| ८ | उच्च शिक्षणातील संशोधनाचे स्वयं मुल्यमापन **डॉ. सुभाष एन. सातव** | ५३ |
| ९ | संशोधन अहवाल लेखनाचा अभ्यास **डॉ. शालीग्राम गोपाळराव शिंदे** | ५९ |


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १० | भाषा आणि संशोधन : एक अभ्यास **डॉ. सुनिल कांबळे** | ६९ |
| ११ | राज्यशास्त्रातील संशोधन पध्दती **डॉ. एस. यु. ढाले** | ७४ |
| १२ | संशोधनात उपकल्पना किंवा गृहितकाचे महत्व **डॉ. कल्याण कदम** | ८१ |
| १३ | सामाजिक संशोधनामध्ये साहित्यांच्या पुनरावलोकनाचे महत्व **के.जे. खंदारे** | ८६ |


T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

## प्रकरण १

# संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अभ्यास


**डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली


SHIVAJI COLLEGE HINGOLI

वर्तमान अवस्था, सद्य:स्थिती यांच्या अभ्यासासाठी जी पध्दत वापरली जाते तिला सर्वेक्षण पध्दती म्हणतात. प्रचलित पध्दती, दृष्टीकोन, वाटचाल परिणाम यांचा अभ्यास या पध्दतीने होतो, सर्वसामान्य परिस्थितीचा विचार ही पध्दत करते. या पध्दंतीत मिळालेल्या माहितीचे व्यवस्थित संघटन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचनं केले जाते. वर्तमानाच्या मोठ्या घटनाकडून माहिती मिळविणे हा या पध्दतीचा महत्वाचा उद्देश आहे. या पध्दतीमध्ये वर्णन व अर्थनिर्वचन करतात. या सर्वेक्षणात केवळ माहिती संकलित करणे आणि पत्रके तयार करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही तर त्यामध्ये मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन सुध्दा करण्यात येते. सर्वेक्षण संशोधनात मोठ्या आणि लहान जनसंख्येचे अध्ययन केले जाते, त्यासाठी जनसंख्येतून न्यादर्शाची निवड करुन त्याचे अंध्ययन केले जाते. समाजशास्त्रीय चलातील संबंध अभ्यासणे, संबंधित घटनेचा शोध घेणे, चलाचे वितरण कसे आले आहे हे अभ्यासणे हा सर्वेक्षण संशोधनाचा विषय असतो.प्रश्न विचारण्याच्या काळजीपूर्वक आयोजलेली पध्दती व नमुना निवडीच्या शास्त्रीय पध्दती वापरुन केलेले शैक्षणिक समस्येचे संशोधन म्हणजे सर्वेक्षण होय.

**सर्वेक्षण पध्दती**

संशोधकाला संशोधन करतांना तथ्ये शोधून त्यांचे संकलन करणे आणि निष्कर्ष काढण्याचे काम करावे लागते. तथ्ये शोधतांना विविध तंत्राचा उपयोग करुन घेतला जातो. काही माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळते तर काही

पुस्तक व लिखित स्वरुपातून मिळते. यालाच प्रथमत: सामग्री आणि व्दितीय सामग्री असे म्हटले जाते. तथ्ये संकलन करण्यासाठी जसे निरीक्षण, ऐतिहासिक आणि तुलनात्मक पध्दतीचा उपयोग केला जातो, तसाच सर्वेक्षण पध्दतीचा सुध्दा उपयोग घेतला जातो. सर्वेक्षण पध्दत ही सुध्दा एक सामाजिक तथ्ये शोधून काढण्यासाठी उपयुक्त आहे. या पध्दतीत एक वा अनेक व्यक्तींचा समावेश असतो. व्यक्तिगत पातळीवरुन एकटा संशोधक सुध्दा माहिती मिळवू शकतो. पण त्यासाठी अभ्यास विषय मर्यादित असतो. अभ्यास विषयाचे स्वरुप विस्तारित आणि व्यापक असेल तर समूह पातळीवरुन विविध घटकांचे सर्वेक्षण केले जाते. सामाजिक संशोधनात तथ्य मिळविण्यासाठी सर्वेक्षण पध्दत फार महत्त्वाची मानली जाते. सामाजिक सर्वेक्षण ही संकल्पना फार प्राचीन आहे. इ.स. पूर्व ३०० मध्ये इजिप्तमध्ये हिरोडोटस् या तज्ञाने लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला. तर ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये सामाजिक प्रश्नांसाठी पाहणी करण्यात आली. आधुनिक सामाजिक सर्वेक्षणाची सुरुवात १९०९ मध्ये पॉल केलॉग यांनी केला. भारतात प्राचीन काळी कौटिल्याची अर्थशास्त्रीय उभारणी सर्वेक्षणावर आधारित दिसते.

सर्वेक्षणात तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

१) वर्तमान स्थिती
२) अपेक्षीत वर्तन
३) आवश्यक साधनांचा बोध

**सर्वेक्षण पध्दतीचे हेतू**

**१) वस्तुनिष्ठ पध्दतीने संशोधन :-**

सर्वेक्षणात अनेक समस्या निर्माण होतात. त्या समस्याचे वस्तुनिष्ठ पध्दतीने संशोधन करण्यात येते. अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी परिस्थिती समजून घ्यावी लागते. याकरिता सर्वेक्षणाच्या वापर करण्यात येतो. संशोधकास वर्तमान स्थितीची सत्यता आकलन होण्यास मदत होते.

**२) विचार, स्पष्टीकरणे, परिकल्पना यांची जाणीव :-**

समस्या निर्माण झाल्यास सर्वप्रथम तिचे स्वरुप समजणे आवश्यक असते. त्यानुसार विचार, स्पष्टीकरणे, परिकल्पना यांची माहिती मिळते. समस्येचे निराकरण करण्यास यथार्थ पध्दतीचा अवलंब करण्यात येतो.

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (M.S.)



अर्थनिर्वचनासाठी तौलनिक सामग्री मिळत असल्याने संशोधकाची अभ्यासाची खोली वाढण्यास मदत होते.

**३) वर्तमान स्थितीचा शोध घेणे :-**

विविध क्षेत्रातील वर्तमान स्थितीचा तपास करणे हा आदर्शमुलक सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू समजण्यात येतो. कधी कधी वर्तमान स्थितीचा शोध घेतांना त्याहिपलीकडे जावे लागते. योग्य बदल घडून आणण्यासाठी उपलब्ध आणि यथार्थ तथ्यांचे मूल्यांकन करण्यात येते. त्यावरुन यथार्थ मार्गदर्शन मिळण्यास मदत होते. प्रचलित अभ्यासक्रमात सुधारणा करणे शक्य होते.

**४) योग्य साधन सामग्रीची निर्मीती :-**

सर्वेक्षणात माहिती गोळा करण्यात येते. त्यासाठी यथार्थ साधने उपलब्ध असणे आवश्यक असते. त्यासाठी अशा साधनांची निर्मिती करता येते.

**५) पुरक माहिती उपलब्ध करणे :-**

मूलभूत संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येतो. याकरिता अशा संशोधनास पूरक माहिती उपलब्ध करणे गरजेचे असते. अशा प्रकारे ज्ञानवृध्दी विशिष्ट क्षेत्रातही घडून येण्यास मदत होते.

**६) शालेय उपक्रमाच्या नियोजनात उपयोगी :-**

शालेय शैक्षणिक सत्रात विविध अभ्यासपूरक उपक्रम राबवावे लागतात. याकरिता अशा उपक्रमाचे नियोजन करावे लागते. या नियोजनात सर्वेक्षणाचा सिंहाचा वाटा असतो. विविध अध्यापन पध्दती, विकसनशील कार्यक्रम, शाळेची इमारत इत्यादी बाबतीत नियोजन करणे गरजेचे असते. याकरीता सर्वेक्षणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विकासाची क्षेत्रे उपलब्ध करण्यास सर्वेक्षणाची कास धरावी लागते.

**संशोधन पध्दतीची वैशिष्ट्ये**

**१) कमी वेळात अधिक माहिती :-**

माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती वापरण्यात येते. अधिकाधिक माहिती कमी वेळात उपलब्ध करता येते. यासाठी प्रश्नावली वापरुन अथवा व्यक्तीच्या मुलाखती घेऊन विविध प्रकारची माहिती गोळा करता येते. त्यासाठी अधिक श्रमाची गरज भासत नाही.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Scanned with OKEN Scanner

**२) तिर्यक छेदात्मक वैशिष्ट्ये :-**

सर्वेक्षणात सद्य:स्थितीतील माहितीच्या संकल्पनास यथार्थ महत्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे विकसनात्मक दृष्टीने विविध कालखंडातील अनेक पातळीवरील माहिती यात अंतर्भूत करता येत नाही. कारण आदर्शमूलक सर्वेक्षण हे तिर्यक छेदात्मक स्वरुपाचे असते. तसेच व्यापक कालखंड घेऊनही त्यात माहितीचे संकलन उभ्या छेदात्मक पध्दतीने माहिती गोळा करणे अवघड असते. त्यासाठी सामान्य जनसंख्येचा तिर्यक छेद घेणे सोईचे असते.

**३) गुणात्मक आणि संख्यात्मक :-**

आदर्शमूलक सर्वेक्षण हे गुणात्मक आणि संख्यात्मक असते. विशिष्ट भागातील माध्यमिक स्तरावर सर्वेक्षण केले तर त्यात पदव्युत्तर पदवी प्राप्त असणा-या अध्यापकांची संख्या किती आहे अशी संख्यात्मक माहिती गोळा करण्याकरीता आदर्शमूलक सर्वेक्षण उपयोगी ठरते. त्याच प्रमाणे कर्तबगार मुख्याध्यापकात कोणते गुण असावेत अशा प्रकारची गुणात्मक यथार्थ माहिती मिळवण्यासाठी सर्वेक्षणाची मदतही होते.

**४) स्थानिक समस्यांचे शीघ्र निराकरण :-**

सर्वेक्षण पध्दती, स्थानिक समस्यांचे तत्पर निराकरण करण्यास उपयोगी पडते. त्याचप्रमाणे स्थानिक निर्णय देण्यास या पध्दतीचा वापर करतात.

**५) पूर्वीच्या संशोधनाचा पाठपुरावा :-**

सर्वेक्षणाचा वापर करताना सद्यस्थिती जाणून घेणे गरजेचे असते. त्यानंतर समस्येचा सखोल व रेखीव अभ्यास सुरु करणे सोयीचे असते. त्यानुसार पूर्व झालेल्या संशोधनाचा पाठपुरावा करण्यासाठी अशा आदर्शमूलक सर्वेक्षणाचा वापर करणे सोयीचे असते.

**६) जनसंख्येच्या वैशिष्ट्यांशी संबंधित :-**

आदर्शमूलक सर्वेक्षण हे जनसंख्येच्या वैशिष्ट्यांशी संबधित असते. तसेच ते गटाच्या वैशिष्ट्यांशीही निगडित असते. मात्र व्यक्तीच्या वैशिष्ट्यांशी संबंधित नसते. विशिष्ट संस्था, विशिष्ट व्यक्ती अथवा विशिष्ट घटना यातील वैशिष्ट्यांची माहिती करणे हा या सर्वेक्षणाचा हेतू नसतो. तर त्यांच्या समूहाची मध्यवृत्ती प्रामुख्याने जाणून घेणे हाच असतो. विद्यार्थ्यांच्या एकंदर दिसणाऱ्या प्रवृत्तीला प्रामुख्याने जाणून घेणे हाच असतो. विद्यार्थ्यांच्या एकंदर दिसणाज्या प्रवृत्तीला यात महत्वाचे स्थान असते. यावरुन असे दिसून येते की, आदर्शमूलक सर्वेक्षणाच्या मुख्य हेतू लोकप्रवाहाची प्रवृत्ती जाणून घेणे हाच असतो. त्यामुळे सर्वेक्षण हे जनसंख्येच्या वैशिष्ट्यांशी निगडित असते.

**७) गणितीय चिन्हांचा वापर करणे :-**

सर्वेक्षण करताना गणितीय चिन्हांचा वापर करण्यात येतो. त्यामुळे समस्या एका विशिष्ट दिशेने सोडविण्यास मदत होते. तसेच यात शाब्दिक वर्णनास सुध्दा महत्व प्राप्त झालेले असते. शाब्दिक भाषा आणि गणितीय चिन्हे यांच्या यथार्थ वापराने सर्वेक्षणास एक विशिष्ट दिशा प्राप्त होत असते.

**८) समस्येचे स्वरुप निश्चित आणि हेतू सुस्पष्ट :-**

आदर्शमूलक सर्वेक्षण पध्दतीत आलेल्या समस्येचे स्वरुप निश्चीत असून त्याचा हेतू सुस्पष्ट असतो यामध्ये प्रथम माहिती गोळा करण्यात येते. गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाते. तद्वतच उद्दिष्टे ठरवून अहवाल लेखन करण्यात येते. यावरुन अनुमान काढण्यात येते. त्यामुळे योग्य दक्षता घेऊन योजना करण्यात येते.

**९) कमी खर्चीक व सोईची पध्दती :-**

सर्वेक्षण पध्दतीमध्ये टपाल सेवा वापरता येते. संशोधक पत्र पाठवून माहिती मागवू शकतो. त्यामुळे संशोधकाला प्रत्यक्ष तेथे जाण्याची गरज नसते. यामुळे जाण्यायेण्याचा खर्च वाचतो व मोठ्या प्रमाणात माहिती मिळविता येते. त्यामुळे ही पध्दती सोईची आहे .

**१०) व्यक्तिच्या गुणकांपेक्षा गटाच्या सरासरीचा विचार :-**

सर्वेक्षण पध्दतीमध्ये विशिष्ट व्यक्तिच्या विचार करण्यापेक्षा एकूण सरासरीचा विचार केला जातो.

उदा. काही व्यक्ती अतिहुशार व काही अति ढ असतात. परंतु सर्वसाधारण विद्यार्थ्यांची संख्या या दोनही पेक्षा जास्त असते. अशा वेळी त्यांच्या सरासरीचा विचार तेथे केला जातो.

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq & Dist. Hingoli
SHIVAJI COLLEGE HINGOLI

**११) सर्वेक्षण हे इतर संशोधनाला सैध्दांतिक बैठक देते.**

सर्वेक्षण हे इतरांच्या संशोधनाला नेहमीच सैध्दांतिक बैठक देत असते. उदा. मी जर एखाद्या विषयावर संशोधन केले. कालांतराने त्याच विषयाशी संबंधित संशोधन कोणी करत असेल तर माझ्या संशोधनाचा फायदा त्याला होऊ शकतो.

**सर्वेक्षण पध्दतीच्या पाय-या**

**१) समस्येची निवड :-**

या पायरीमध्ये संशोधक आपली समस्या निश्चीत करीत असतो. ती योग्य असावी याची खबरदारी घेतो. समस्येच्या पार्श्वभूमीची माहिती देतो.

**२) गरज आणि महत्व :-**

यामध्ये संशोधक आपली समस्या आजच्या काळात किती महत्वाची आहे तसेच तिची गरज आज काय आहे हे स्पष्ट करतो.

**३) शीर्षक :-**

संशोधकाने निवडलेल्या समस्येला योग्य व सुस्पष्ट शीर्षक या पायरीमध्ये देण्यात येते.

**४) उद्दीष्ट्ये :-**

संशोधकाने समस्या निश्चित केल्यानंतर त्याची उद्दीष्टे निश्चित करणे आवश्यक असतात ती या पायरित केली जातात.

**५) कार्यात्मक व्याख्या :-**

संशोधकाने जो संशोधन विषय निवडला आहे त्यांच्या शीर्षकाची कार्यात्मक व्याख्या यामध्ये देण्यात येते.

**६) व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधनाला निश्चित दिशा देण्यासाठी त्याची व्याप्ती या पायरित ठरवण्यात येते. संशोधक इतरत्र भटकू नये यासाठी मर्यादा निश्चीत केल्या जातात.

**७) संबंधित साहित्याचा आढावा :-**

यामध्ये संशोधक आपल्या संशोधन विषयाशी संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा यात घेत असतो. यामुळे संशोधनाला निश्चित दिशा व गती प्राप्त होते.

T.C

Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



**८) जनसंख्या व नमुना :-**

संशोधनाकरिता जनसंख्या व त्या जनसंख्येची संपूर्ण वैशिष्ट्ये असलेला नमुना संशोधकाला निवडायचा असतो नमुन्यावरुन काढण्यात येणारे निष्कर्ष या संपूर्ण जनसंख्येला लागू होणार आहेत. त्याची जाणीव संशोधकाला असणे गरजेचे आहे.

**९) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

गोळा केलेल्या माहितीचे प्रथम वर्गीकरण करावे लागते. त्याव्दारे संशोधकास तिची वैशिष्ट्ये कोणती याची कल्पना येईल. वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण अभ्यासकास करणे आवश्यक असते. सर्वेक्षण करुन मिळालेल्या माहिती वर्गीकरणातून व माहितीतून वस्तूस्थितीची स्पष्ट कल्पना येऊ शकते. त्यानुसार अभ्यासविषय व तेथील वास्तव परिस्थिती विचारात घेऊन माहितीचे अर्थनिर्वचन करावे लागते. यात वस्तुस्थितीवर आधारित माहितीचा अर्थ लावणे सोईचे होईल.

**१०) निष्कर्ष व शिफारशी :-**

विश्लेषण व अर्थनिर्वचन केल्यानंतर संशोधक आपल्या संशोधन समस्येचे निष्कर्ष काय निघाले ते पाहत असतो व वस्तुनिष्ठ स्वरुपात त्याची मांडणी करीत असतो.

**११) अहवाल निर्मिती :-**

संशोधक आपले संशोधन कार्य अहवाल रुपाने लिहत असतात ज्या स्तरावर हा प्रकल्प राबविला त्या स्तरातील सर्व घटकांना शब्दांत त्याची मांडणी केली जावी यामध्ये द्विअर्थी शब्द व क्लिष्टता राहणार नाही याची काळजी घ्यावी.

**सर्वेक्षण पध्दतीचे दोष व मर्यादा (Demerit &limitation in Survey Method)**

१) व्यक्ती हा समाजाचा घटक आहे हे समजून व्यक्तीकडून माहिती गोळा केली जाते. अशी सर्व गोळा केलेली माहिती मध्यवृत्तीच्या परिमाणाचे गटाची निर्देशक म्हणून सांगितली जाते. परंतु काही प्रसंगी ती तशी असतेच असे नाही. म्हणजेच मिळालेली माहिती सत्य असेलच असे नाही.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Scanned with OKEN Scanner

२) व्यक्तीच्या उत्तरावरुन येथे निष्कर्ष काढलेले असतात. परंतु दिलेली उत्तरे आणि प्रत्यक्ष कृती यात अंतर असण्याची शक्यता असते.म्हणजेच निष्कर्ष पूर्णपणे वस्तूनिष्ठ नसतात.

३) एका विशिष्ट वेळी लोकांनी दिलेल्या उत्तराचा व प्रतिसादाचा यात विचार केला जातो. त्याअर्थाने ही पध्दत आत्याधिक स्थिर आहे.

४) अशिक्षित व निरक्षर लोकांना माहितीच नसण्याची शक्यता असते अशी माहिती या लोकांकडून येथे निष्कर्ष काढलेले असतात.

५) सर्वेक्षणासाठी कार्यक्रमाचा आराखडा तयार करुन त्यानुसार कार्य करावे लागते.

**सर्वेक्षणाचे अभ्यास विषय (Study Subject in Survey)**

**१) लोकसंख्या :**

सामाजिक सर्वेक्षणात लोकसंख्येचा विचार केला जातो. यामध्ये लोकसंख्येचा वैज्ञानिक दृष्टीने अभ्यास करणाऱ्या लोकतज्ञाची मदत घेतली जाते. लोकसंख्येच्या माहितीत लोकसंख्येचे परिणाम, स्वरुप, प्रदेशवार विभागणी, गतिशिलता, मृत्यूदर, जन्मदर, स्थानांतर संख्या, वय, संघटना, स्त्री पुरुष प्रमाण, लोकांची वैवाहिक स्थिती, कुटूंब संस्था, त्यांची रचना इत्यादिंचा विचार केला जातो.

**२) सामाजिक पर्यावरण :**

मानवी जीवनावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे सामाजिक पर्यावरण होय. यामध्ये घरेदारे, कपडालत्ता, यंत्रसामुग्री, अन्नधान्य इ. भौतिक वस्तुबरोबरच रीतीरिवाज, प्रथा, परंपरा, रुढी, विचार, नीतीकल्पना, धर्म, तत्वज्ञान, राज्यसंस्था, अर्थव्यवस्था आदी अभौतिक घटकांचा समावेश होतो.

**३) लोकांचे वर्तन व क्रिया :**

सामाजिक सर्वेक्षणाचा वापर लोकांची कृती व वर्तन अजमाविण्यासाठी केला जातो. लोकांच्या कृती व वर्तनाचा अभ्यास समाजजीवन समजून घेण्यासाठी अत्यंत जरुरी आहे. आर्थिक व्यवहाराचा म्हणजेच व्यवसायाचा अभ्यास सामाजिक सर्वेक्षणात केला जातो. लोकांना मिळणारा फावला वेळ, छंद, सवयी, फिरण्याच्या



प्रवासाच्या सवयी, वर्तमानपत्र वाचणे, रेडिओ, टेलीव्हिजन पाहणे या संबंधीची माहिती लोकजीवन अभ्यासतांना असावी लागते.

**४) लोकांची मते व अभिवृत्ती :**

एखादी घटना, व्यक्ती बद्दल, लोकांची मते व त्या संबंधीच्या त्यांच्या प्रवृत्ती कोणत्या आहेत हे पाहण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. सर्वेक्षण,वर्तमानपत्रे लोकांची मते व अभिवृत्ती यांचा अभ्यास करीत असते.

**शोध निबंधाचे शीर्षक**

"संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अभ्यास."

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

**प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

१. संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीचा आढावा घेणे.

२. संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीच्या पाय-या व वैशिष्टाचाआढावा घेणे.

३. पीएच.डी संशोधकाची संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीच्या वापराबाबतचा मते जाणून घेणे **शोध निबंधाची परिकल्पना :**

१. पीएच.डी संशोधक हे संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर अधिक करतात.

**शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

१. प्रस्तुत शोध निबंधात संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीचा समावेश करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत शोध निबंधात संशोधन पध्दतीच्या सर्वेक्षण पध्दतीच्या पाय-या व वैशिष्टाचासमावेश करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत शोध निबंधात पीएच.डी संशोधकाची संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीच्या वापराबाबतचा मताचा अभ्यास करण्यात आला आहे.

**शोध निबंध संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध संशोधन हे वर्तमानकाळाशी संबंधीत असल्यामुळे सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**शोध निबंध नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी सुगम यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने २० मुले व

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Dist.Hingoli (MS.)
SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Scanned with OKEN Scanner

२० मुली पीएच.डी संशोधन पुर्ण केलेल्या संशोधकांची निवड करण्यात आली होती.

**शोध निबंध संशोधनाची साधने :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी मतावली या साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**शोध निबंध संख्याशास्त्रीय तंत्र :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी ' t ' मूल्य या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**मुले व मुली पीएच.डी संशोधकाची संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीच्या वापराबाबतचा मताची तुलना दर्शविणारी सारणी**

| गट | नमुना | मध्यमान (M) | (SD) | (σDM) | प्राप्त 't' | (D F) | सारणीवरून t मूल्य | | सार्थकता | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ०.०५ | ०.०१ | ०.०५ | ०.०१ |
| मुले पीएच.डी संशोधक | २० | २२.४ | ४.३ | ०.९२ | ७.२८ | ३८ | १.९८ | २.६१ | सार्थक | सार्थक |
| मुली पीएच.डी संशोधक | २० | १५.७ | ९.२ | | | | | | | |

**शोध निबंधाचे निष्कर्ष :**

१. पीएच.डी मुले व मुली संशोधकाची संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीच्या वापराबाबतचा मताची तुलना केली असता मुलीच्या तुलनेत मुले सर्वेक्षण पध्दतीचा वापर अधिक करतात.

२. सर्वेक्षण पध्दतीत एका विशिष्ट वेळेच्या परिस्थिती अगदी मोठ्या जनसंख्येच्या संदर्भात माहिती संकलित करण्यात येते.

३. या सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते. कोणकोणत्या बाबी कोणत्या स्थितीत उपलब्ध आहे याची माहिती मिळते. समस्या निराकरणाकरीता कोणती स्थिती अपेक्षीत आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते.

४. विविध शालेय उपक्रमांचे नियोजन करण्यात सर्वेक्षणाची मदत होते.

५. वर्तमान काळात उपयुक्त असा भूतकाळाचा अभ्यास केला जातो व या

T.C
Shivaji College, Hingoli. Tq.& Dist.Hingoli.(MS.)



सर्वातून भविष्यकालीन प्रगतीचा वेध घेतला जातो.

६. सर्वेक्षणाद्वारे मूलभूत संशोधनासाठी पूरक अशी माहिती पुरविली जाते. तसेच विशिष्ट विषयक्षेत्रात ज्ञानवृध्दी केली जाते.

७. फलांच्या अर्थनिर्वचनासाठी उपयुक्त असलेली तुलनात्मक माहिती मिळते.

८. संशोधन वर्तमान काळात केले जाते व त्यासाठी प्रश्नावली, अनुसूची, मुलाखतीचा उपयोग केला जातो.

९. संशोधन वस्तुनिष्ठ असते यात सर्वेकर्ता किंवा उत्तरदात्याची मनोवृत्ती कला, पूर्वग्रह, पसंती, नापसंती इत्यादीला स्थान नसते.

**शोध निबंध शिफारशी**

१ संशोधन पध्दतीचा वापर संशोधन विषयाला अनुरूप करण्यात यावा.

२. संशोधन अभ्यासानंतर मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार संशोधन पध्दतीची वापर करावा.

३. संशोधक विभागांनी संशोधन वर्गाचे आयोजन करून संशोधन उद्बोधन वर्ग आयोजित करावेत.

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

## संदर्भ सूची :-

१] के. यु. घोरमोडे, कला घोरमोडे (२००८), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे" नागपूर: विद्या प्रकाशन.

२] बन्सी बिहारी पंडित (२००८), "शिक्षणातील संशोधन", पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

३] वि. रा. भिंताडे (२००८), "शैक्षणिक संशोधन पद्धती", पुणे : नूतन प्रकाशन.

४] रा. श.मुळे, वि. तु. उमाठे (१९८७), "शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे", नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

५] द. खं. पोखरापूरकर (२००७), "पथदर्शक अभ्यासाचे संशोधनात उपयोजन", पुष्प सहावे (संशोधन मार्गदर्शक मालिका), नाशिक, य.च.म.मु.वि..

Scanned with OKEN Scanner